मध्य चांदा वनविभाग, चंद्रपूर यांचे वनपरिक्षेत्रातील पोंभुर्णा येथील विश्रामगृहाचे भोवती वॉल कंम्पाउंड ग्रीलसह बांधणेसाठीचे अंदाजपत्रकास प्रशासकीय मान्यता प्रदान करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
महसूल व वन विभाग,
शासन निर्णय क्र.वनबां-२०१८/प्र.क्र.६७/फ-९
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
दिनांक :- १४ मार्च, २०१८

वाचा :- अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (अर्थसंकल्प, नियोजन व विकास), महाराष्ट्र राज्य, नागपूर यांचे पत्र क्र. कक्ष २४/वअ/लेखा/प्र.क्र.१४३/९५०/२०१७-१८, दिनांक १६.०१.२०१८.

प्रस्तावना:-

मध्य चांदा वनविभाग, चंद्रपूर यांचे वनपरिक्षेत्रातील पोंभुर्णा येथील विश्रामगृहाचे भोवती वॉल कंम्पाउंड ग्रीलसह बांधकामासाठी आवश्यक असलेल्या बाबी विचारात घेऊन कार्यकारी अभियंता, चंद्रपूर पाटबंधारे विभाग, चंद्रपूर यांनी Decorative Compound Wall (मागील बाजूस) व दर्शनी बाजूच्या प्रवेशद्वार व कुंपण भिंतीचे काम याकामाचे रू.५६,०५,१६३/- इतक्या रकमेच्या दोन अंदाजपत्रकास तांत्रिक मान्यता प्रदान केलेली आहे.

संदर्भाधिन पत्रान्वये अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (अर्थसंकल्प, नियोजन व विकास), महाराष्ट्र राज्य, नागपूर यांनी प्रशासकीय मान्यतेसाठी शिफारशीसह प्रस्ताव सादर केला आहे. त्याअनुषंगाने अंदाजपत्रकाचे छाननीअंती मध्य चांदा वनविभाग, चंद्रपूर यांचे वनपरिक्षेत्रातील पोंभुर्णा येथील विश्रामगृहाचे भोवती वॉल कंम्पाउंड ग्रीलसह बांधकामासाठी Decorative Compound Wall with Entrance Gate (पुढील बाजूस) रु.२८,२७,४९२/- व Compound Wall with Grill (मागील बाजूस) रु.२६,३७,५४८/- असे जी.एस.टी.सह एकूण रू.५४,६५,०४०/- (रुपये चौपन्न लक्ष पासष्ट हजार चाळीस फक्त) इतक्या रकमेच्या अंदाजपत्रकास सार्वजनिक बांधकाम विभागाने सहमती दिलेली आहे. त्यानुसार सदर अंदाजपत्रकास प्रशासकीय मान्यता देण्याबाबतची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय :-

मध्य चांदा वनविभाग, चंद्रपूर यांचे वनपरिक्षेत्रातील पोंभुर्णा येथील विश्रामगृहाचे भोवती वॉल कंम्पाउंड ग्रीलसह बांधकामासाठी Decorative Compound Wall with Entrance Gate (पुढील बाजूस) रु.२८,२७,४९२/- व Compound Wall with Grill (मागील बाजूस) रु.२६,३७,५४८/- असे जी.एस.टी.सह एकूण रू.५४,६५,०४०/- (रुपये चौपन्न लक्ष पासष्ट हजार चाळीस फक्त) इतक्या रकमेच्या अंदाजपत्रकास सार्वजनिक बांधकाम विभागाने दिलेल्या सहमतीस व सोबत जोडलेल्या “प्रपत्र-अ” मध्ये नमूद केल्याप्रमाणे तसेच खालील अटींच्या अधीन राहून शासनाची प्रशासकीय मान्यता देण्यात येत आहे.

१. सदर प्रस्तावाच्या अनुषंगाने कार्यवाही करत असताना उपभोक्त्या विभागामार्फत सार्वजनिक बांधकाम विभाग, शासन निर्णय क्र.बीडीजी-२०१४/प्र.क्र.९६/इमा-३, दिनांक ८.७.२०१४ मधील कार्यपध्दतीनुसार कार्यवाही करण्यात यावी.

२. सदर प्रस्तावासोबत सादर केलेल्या २ अंदाजपत्रकांतील दोन्ही कामाची एकत्रित निविदा मागविण्यात यावी.

३. काम सुरु करण्यापूर्वी जागेच्या मालकी हक्काबाबतची पूर्तता करुन घ्यावी.

४. ढोबळ स्वरूपात धरण्यात आलेल्या तरतुदीबाबत काम करतेवेळी विस्तृत अंदाजपत्रक दरपत्रके मंजूर करूनच काम हाती घ्यावे.

५. प्रत्यक्ष काम करते वेळी पर्यावरण विभाग, शासन निर्णय क्र.इएनव्ही/२०१३/ प्र.क्र.१७७/ तां.क.१, दि.१० जानेवारी २०१४ मध्ये उल्लेख करण्यात आलेल्या मार्गदर्शक तत्वांनुसार कार्यवाही करण्यात यावी.

६. सदरहू कामे करतांना वन (संवर्धन) अधिनियम १९८० अंतर्गत तरतूद तसेच प्रचलित कायदे / नियम संदर्भाधिन तरतूदींचा भंग होणार नाही. तसेच कोणतीही अनियमितता होणार नाही याची दक्षता घ्यावी.

सदर आदेश शासन निर्णय वित्त विभाग, क्र. विअप्र १०.०८/प्र.क्र.७०/२००८/ विनियम, दिनांक १५ मे, २००९, वित्तीय अधिनियम नियम पुस्तिका, १९७८, भाग पहिला, उप विभाग-पाच नुसार महाराष्ट्र सार्वजनिक बांधकाम नियम पुस्तिका अंतर्गत प्रदान करण्यात आलेले वित्तीय अधिकार, अ.क्र. १, परिच्छेद क्र. १३४ नुसार विभागास असलेल्या वित्तीय अधिकारानुसार व सार्वजनिक बांधकाम विभाग यांच्या सहमतीने, निर्गमित करण्या् येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.inया संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१८०३१५१५२४४६४०१९ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांचे आदेशानुसार व नावाने,

Sujay Dodal

Digitally signed by Sujay Dodal
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Revenue and Forest Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=353112ee0fa47f9ff9bedae88f651d09fdb142df5fbce9c004f7eea06d8b9baf, cn=Sujay Dodal
Date: 2018.03.15 15:27:56 +05'30'

(सुजय दोडल)
सह सचिव (वने)
महसूल व वन विभाग

प्रति,

१. प्रधान मुख्य वनसंरक्षक (वनबल प्रमुख), महाराष्ट्र राज्य, नागपूर
२. अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (अर्थसंकल्प, नियोजन व विकास), महाराष्ट्र राज्य, नागपूर
३. मुख्य वनसंरक्षक (प्रादेशिक), चंद्रपूर
४. उपवनसंरक्षक, मध्य चांदा वनविभाग, चंद्रपूर
५. महालेखापाल-१/२ (लेखा परिक्षा/लेखा व अनुज्ञेयता) महाराष्ट्र राज्य, मुंबई / नागपूर.
६. सार्वजनिक बांधकाम विभाग, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
७. वित्त विभाग, व्यय-१० कार्यासन, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
८. नियोजन विभाग (का-१४७५), मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
९. फ-२/ब-१ कार्यासन, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
१०. कार्यासन फ-९, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.(निवडनस्ती)

“प्रपत्र-अ”

शासन निर्णय क्रमांक :-वनबां-२०१८/प्र.क्र.६७/फ-९, दिनांक १४ मार्च,२०१८

NAME OF WORK :- CONSTRUCTION OF ENTRANCE GATE WITH DECORATIVE WALL COMPOUND FOR POMBHURNA RESTHOUSE IN POMBHURNA RANGE OF CENTRAL CHANDA DIVISION		
GENERAL ABSTRACT		
S.N.	**PARTICULARS**	**Amount in Rs.**
1	CIVIL CONSTRUCTION COST	24,16,660.00
2	ADD 1% TESTING CHARGES	24,167.00
3	ADD 12% GST	2,89,999.00
4	**ADD** 4% FOR CONTINGENCIES CHARGES	**96,666.00**
	Total Amount (A) :-	**28,27,492.00**
NAME OF WORK :- CONSTRUCTION OF COMPUND WALL FOR FOREST REST HOUSE (WITH GRILL) AT POMBHURNA IN POMBHURNA RANGE OF CENTRAL CHANDA DIVISION (LENGTH:- 290 RMT)		
1	CIVIL CONSTRUCTION COST	22,54,311.00
2	ADD 1% TESTING CHARGES	22,548.00
3	ADD 12% GST	2,70,517.00
4	**ADD** 4% FOR CONTINGENCIES CHARGES	90,172.00
	Total Amount (B) :-	**26,37,548.00**
	Total (A+B) :-	**54,65,035.00**

******